SAMPLE CONTENT

# जगावेगळी माणसं जगावेगळ्या गोष्टी

डॉ. सुषमा देशमुख



# प्रस्तावना

डॉ. सौ. सुषमा देशमुख यांच्या 'जगावेगळी माणसं, जगावेगळ्या गोष्टी' या पुस्तकाची द्वितीय आवृत्ती प्रकाशित होत आहे, ही फार आनंदाची गोष्ट आहे. त्यांनी या पुस्तकात काही जगावेगळ्या माणसांच्या जगावेगळ्या गोष्टी सांगितल्या आहेत आणि कोणतीही अतिशयोक्ती न करता वास्तवदर्शी भूमिकेतून मी म्हणू शकतो की, त्यांचे हे पुस्तकही चांगल्या अर्थाने जगावेगळेच आहे.

डॉ. देशमुख या निष्णात डॉक्टर आहेत आणि आपल्या व्यवसायाच्या निमित्ताने त्यांच्या संपर्कात आलेल्या काही व्यक्तींचा त्यांनी आपल्या या पुस्तकात परिचय करून दिला आहे. मला या पुस्तकाच्या बाबतीत जाणवलेली पहिली म हत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी हे लेखन करताना आपल्या व्यावसायिक कौशल्याचे प्रदर्शन करण्याचा प्रयत्न अजिबात केलेला नाही. त्यांच्याकडे उच्च दर्जाचे कौशल्य आहे हे पुस्तकाच्या वाचनातून समजले, तरी ते कौशल्य वाचकांच्या मनावर कधीही अतिक्रमण करीत नाही, त्यांना खुपत नाही. उलट, त्या ज्या व्यक्तींविषयी लिहीत आहेत, त्या व्यक्तींवरच वाचकांचे मन केंद्रित होते. लेखिकेने संवेदनशील मनाने या व्यक्तींचे वर्तन टिपले आहे आणि पुस्तकापुरते बोलायचे तर आपण क्षणभर लेखिकेचे निष्णात डॉक्टर असणे बाजूला ठेवले, तरी हळुवार संवेदनशीलतेचे श्रेय तिला दिलेच पाहिजे.

पहिल्याच प्रकरणात कॅन्सरग्रस्त पंचफुलाबाईंच्या नत्थू या जावयाची कथा येते. डॉ. देशमुख यांना प्रारंभी असे वाटत असते, की इतक्या निष्ठेने पंचफुलाबाईंची सेवा करणारा हा तरुण त्यांचा मुलगा असावा. प्रत्यक्षात तो त्यांचा जावई असतो. हा तरुण चाकोरीच्या वाटेने जाणारा नाही, तर अनेकांसाठी जगण्याची अधिक आनंददायक वाट दाखवणारा आहे. या नत्थूला जीवनाची किती असाधारण

समज आहे! या नत्थूने आपल्या सासूसाठी आत्मियतेने आणि सेवाभावाने जे काही केले, ते प्रत्यक्ष वाचल्यावर त्याच्यासाठी आपल्या काळजात एक छानसा कोपरा तयार होतो.

नमिताची काळजी घेणारा तिचा पती अशोकदेखील आपल्याला बरेच काही शिकवून जातो. कुटुंबातील आणि नात्यांतील अनेकांची काळजी घेणाऱ्या कुसुमताई आणि त्यांच्या जावा अशाच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांचे वेगळेपण सध्याच्या काळात तर मनावर मोठा ठसा उमटवून जाते. हे स्पष्ट व्हावे म्हणून कुसुमताईंचे स्वत:चे शब्दच मी इथे उद्‌धृत करतो. त्या डॉ. देशमुखांना म्हणाल्या, ''आम्ही चार जावा, मी सगळ्यांत मोठी. मला तीन नणंदा आहेत. खूप मोठे कुटुंब आहे. आम्ही पंचवीस-तीस वर्षं एकत्रच राहिलो. आता आम्हांला सुना, जावई आले, तेव्हा आमच्याच सासूबाईंनी चौघींना नागपुरात चार घरं दिली. आम्ही एकत्र राहात नसलो, तरी आमचं चौघींचं एकमेकींशिवाय पान हालत नाही. अहो, आमच्या सगळ्यांच्या बाळंतपणातसुद्धा आम्हीच एकमेकींसाठी केलं. तुम्हाला सांगते, गेल्या तीस वर्षांत आमच्यासाठी आमच्या घरातला पुरुष कधी दवाखान्याची पायरी चढला नाही. तुम्ही कधी बघितलं का आजपर्यंत माझ्या किंवा माझ्या जावेच्या यजमानांना इथं हॉस्पिटलमध्ये? ते चारी भाऊ बिचारे सकाळपासून कामात असतात. म्हणून आम्ही त्यांना कधी त्रास देत नाही. आम्हीच चौघी मिळून सगळं सांभाळतो. फक्त पैसा द्यायचं काम त्यांचं. एक जण जरी कुठल्या दवाखान्यात गेली, तरी ती लगेच फोन करून आम्हां सगळ्यांना कळवते. मग आम्ही सगळ्या एकत्र येऊन निर्णय घेतो. बऱ्याचदा आमच्या घरच्यांना कुणी हॉस्पिटलमध्ये अर्ध्या दिवसासाठी भरती झालं असलं तरी ते रात्री घरी आल्यावरच कळतं. आम्ही चौघी अगदी एक आहोत बघा.'' यावर डॉ. देशमुखांनी काढलेले उद्‌गार अगदी सार्थ आहेत, ''धन्य धन्य त्या कुसुमताई आणि त्यांच्या तीन जावा!''

नातेवाइकांची काळजी घेणाऱ्या शालिनीताई, पती अनुरूप नसतानाही त्याचे आणि त्याच्या कुटुंबाचे हाल होऊ नयेत म्हणून घटस्फोट घ्यायला नकार देणारी सुहास, ही व्यक्तिमत्त्वे तशी जगावेगळीच. काही लोकांना तर सुहासचा निर्णय आवडणारही नाही; परंतु जगात केवळ स्वत:चाच विचार न करता व्यापक विचार करणारी माणसे असतात, हे तिच्या उदाहरणावरून ध्यानात येते. कॅन्सरने मरण पावलेल्या संजीवनीचे वडील आपल्या मुलीच्या मृत्यूचे दु:ख पचवून कॅन्सरच्या निर्मूलनासाठी संस्था स्थापन करतात आणि त्यांचा हा प्रयास डॉ. देशमुख म्हणतात त्याप्रमाणे 'खरंच वंदनीय आहे.'

आई आणि वडील दोघेही मूकबधिर असताना स्वत:चा तिसरीचा अभ्यास सांभाळून त्या दोघांना जबाबदारीने सांभाळणारा छोटासा मुलगा आजच्या तरुण पिढीला आत्मविश्वासाचे नवे धडे देणारा आहे. त्याचा हा प्रवास पाहून डॉ. देशमुखांचे मन हेलावून गेले, हे स्वाभाविकच होय. त्याने त्यांच्या फीची चौकशी केली, तेव्हा त्या त्याला म्हणाल्या, ''बाळा, मी कशी रे तुमच्याकडून फी घेऊ? आज तू मला नकळत शिकवण दिलीस. एक आदर्श उभा केलास, हा माझ्यासाठी लाखमोलाचा अनुभव आहे. तुला जेव्हा पण गरज पडेल, तेव्हा कधीही तुझ्या आईला घेऊन ये.''

मिल्कमदरच्या दुधाला जागून तिची पूर्ण जबाबदारी स्वीकारणारी थायलंडमधील मिल्कडॉटर फॅमी लक्षात राहते. मुलगी मोठी होईपर्यंत आपल्या इच्छाशक्तीने कॅन्सरवरही मात करणारी स्त्री आणि तिला सर्व प्रकारे साथ देणारे तिचे पती स्मरणात राहतात. पत्नीला कॅन्सर झाल्यानंतर तिची सेवा करणारे आणि तिने कॅन्सरला धैर्याने तोंड दिल्याबद्दल लोकांनी तिचे कौतुक केल्यावर आपण या काळात काय काय सोसले याचे कोणी कौतुक करीत नाही अशी लटकी तक्रार करून सर्वांना हसवणारे पाटीलकाका बरेच काही शिकवून जातात. आयुष्यभर त्रास सहन केल्यानंतर महिलाश्रमात काम करताना कमलमावशी जे म्हणते, ते एकीकडून व्यथित करणारेही आहे आणि दुसरीकडून स्वत:चे दु:ख पचवून इतरांची दु:खे दूर करण्यासाठी धडपडणाऱ्या स्त्रीच्या मनाची उदारताही कळते. ती म्हणते, ''माझे आयुष्य तर वाया गेले, तर आता या वाया गेलेल्या आयुष्याच्या अनुभवावरून, माझ्यासारख्या कमीत कमी दहा बायकांचे तरी आयुष्य सावरेन!''

अशी आणखी कितीतरी व्यक्तिमत्त्वे डॉ. देशमुख यांनी आपल्या या पुस्तकात सहृदयतेने आणि संवेदनशीलतेने रेखाटली आहेत.

डॉ. देशमुख यांनी आपल्या वैद्यकीय आणि सार्वजनिक जीवनात भेटलेल्या व्यक्तींची चित्रणे जशी केली आहेत, तशीच आपल्या कुटुंबातील काही व्यक्तींचीही हृद्य चित्रणे केली आहेत. आपल्या आईला हृदयविकाराचा त्रास झाल्यानंतर आपल्या वडिलांच्या आईला झालेल्या वेदनेचे अतिशय भावपूर्ण चित्रण डॉ. देशमुख यांनी केले आहे. आपल्या सुनेला हृदयविकार झाल्याचे समजल्यानंतर डॉ. देशमुखांच्या या आजी किती अस्वस्थ झाल्या होत्या, ते त्यांनी अगदी उत्कटपणे नोंदविले आहे. डॉ. देशमुख आणि त्यांची भावंडे त्यांच्या वडिलांच्या आईला 'आई'च म्हणत असत. त्या आई त्या प्रसंगी काय म्हणाल्या आणि त्यावर डॉ. देशमुख यांची प्रतिक्रिया काय होती, ते मुळातून पाहण्यासारखे आहे. डॉ. देशमुख लिहितात, ''आई म्हणाली, 'मला बोलू दे. मला तुम्ही सगळे तुझ्या मम्मीवरून

ओवाळून टाका. मी मेले तरी चालेल गं. पण तुमच्या मम्मीला काही झालेलं मला चालणार नाही.' आम्ही सगळे तिच्या बोलण्याने थक्क झालो. आईला रडे आवरत नव्हते. ती अगदी थरथर कापत होती. तिला असे अश्रू ढाळताना आम्ही इतक्या वर्षांत कधीच पाहिले नव्हते. सुनेवर असं उत्कट प्रेम करणाऱ्या सासूचं अनोखं रूप मी पाहतच राहिले. अशा आमच्या आजीला (आईला) माझे कोटी कोटी प्रणाम!''

आजूबाजूचे जग अनेकदा स्वार्थातून निर्माण झालेल्या कारस्थानांनी काटेरी बनलेले असते. खरेतर कोणीही माणूस एकटा राहू शकत नाही. त्याला इतरांचा संपर्क हवाच असतो. अशा संपर्काविना कोणी जगूही शकणार नाही, इतकी या संपर्काची आवश्यकता असते. परंतु असंख्य लोकांना इतरांशी होणारा आपला संपर्क आनंदमय कसा करावा हे कळत नाही. मग आपल्या संपर्कातून इतरांना आनंद कसा द्यावा हे कळणे तर फार दूरचे झाले! मानवी जीवनात या प्रकारांतून अनेक दु:खे निर्माण होतात. डॉ. देशमुख यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे मात्र एक प्रकारे या सगळ्याला अपवादात्मक आहेत. संपूर्ण समाजाला एक नवी दिशा, एक नवा प्रकाश देणारी आहेत. मनाला प्रसन्न करणारी आहेत. समाजव्यवस्थेला निकोप बनवण्याचा मार्ग दाखविणारी आहेत. माणसांच्या अंतरीच्या सर्जनशक्ती जागविणारी आहेत. माणसाने खराखुरा माणूस कसे बनावे, हे आपल्या आचरणानेच दर्शवणारी आहेत.

डॉ. सुषमा देशमुख यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकाची नवी आवृत्तीही वाचकांना आवडेल, यात शंका नाही. मी त्यांच्या लेखनाला आणि त्यापेक्षाही त्यांनी हाती घेतलेल्या जीवितकार्याला अंत:करणपूर्वक सदिच्छा देतो.

**– आ. ह.साळुंखे**

'लोकायत',
१३, यशवंतनगर,
गेंडामाळ, सातारा – ४१५ ००२
दूरध्वनी : ०२१६२ – २५०७२५/२५२७८८

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | कौन करेगा फिर? | १ |
| २. | डॉक्टर, आम्ही जिंकलो | ६ |
| ३. | आम्ही सगळे एक आहोत! | १२ |
| ४. | डॉक्टर, फक्त सांगा काय करायचं? | १६ |
| ५. | मेरे लिए तो ये भगवान हैं! | २० |
| ६. | मी लढा देईन! | २५ |
| ७. | डॉक्टरमावशी, मी आहे ना! | २९ |
| ८. | मिल्क (मदर) डॉटर | ३२ |
| ९. | देवा, मला थोडा वेळ दे | ३६ |
| १०. | अरे, माझं कुणाला कौतुकच नाही! | ४० |
| ११. | मी त्यांचं आयुष्य सावरेन! | ४४ |
| १२. | आम्ही हिंमत हरणार नाही | ४८ |
| १३. | मी पण पक्की भारतीय आहे | ५२ |
| १४. | तुझं जगणं, एक आव्हान पेलणं! | ५६ |
| १५. | मी हे व्रतच घेतलंय! | ६१ |
| १६. | डॉक्टर, खरं सांगा ना! | ६५ |
| १७. | मूड खराब करायचा नाही | ६८ |
| १८. | आम्ही तुझी काळजी घेऊ! | ७२ |
| १९. | चॅलेंज गर्ल | ७५ |

२०. वंडर गर्ल ........................................ ८३
२१. त्याला मी स्वीकारला आहे! ........................................ ८८
२२. हमारी दीदी ........................................ ९१
२३. हे तर विधिलिखितच होतं! ........................................ ९५
२४. डॉक्टर, तुम्हीच त्याला बरं करणार! ........................................ ९८
२५. आम्ही आणि आमच्या दोन गोड मुली ........................................ १०२
२६. आमचा धनीराम ........................................ १०६
२७. बाबा आणि माहेरपण ........................................ ११०
२८. नवरा शत्रू की मित्र? ........................................ ११४
२९. आत्मविश्वास ........................................ १२०
३०. बॉंबे ताता ........................................ १२३
३१. वडील मित्र आण्णा ........................................ १२६
३२. वुई आर मेंटली डिव्होर्सड् ........................................ १३०
३३. असाही एक लग्नाचा वाढदिवस! ........................................ १३३
३४. आमच्या आक्का ........................................ १३७
३५. आई (सासूच्या रूपातील माझी आजी) ........................................ १४२
३६. जगावेगळी माणसं ........................................ १४६

# जगावेगळी माणसं

काही माणसांचा पिंडच वेगळा असतो. सेवाभावनेने त्यांच्या मनाचा कब्जा घेतलेला असतो. अशोक राव त्यांपैकीच एक! बरेच जण आर्थिक परिस्थिती चांगली झाल्यावर किंवा कौटुंबिक कर्तव्ये पार पडल्यावर सामाजिक कामाकडे वळतात. त्यात चुकही काही नाही. पण काही व्यक्तिमत्वेच अशी असतात की, त्यांची नाळ समाजाच्या सुखदु:खांशी जोडलेली असते. त्यासाठी ते वयाचा, पैशाचा विचार करत नाहीत.

अशोक राव माझ्याकडे खूप वर्षांपासून यायचे. सुरुवातीला ते हॉस्पिटलला आले तेव्हा एक पॅम्प्लेट घेऊन आले होते. आमचे वंध्यत्व व कॅन्सर या दोन गोष्टींवर विशेष काम चालते. त्यांनी स्वत:ची ओळख करून दिली व हा कागद समोर ठेवला. मला तो बघून थोडे आश्चर्य वाटले. कारण त्यावरच्या मजकुरामध्ये असे होते की, जी माणसे आजाराने पीडित आहेत त्यांची तिथे सेवा केली जाते ती पण अगदी कमी दरात किंवा विनामूल्य! ते मला म्हणाले, 'तुमच्याकडे कॅन्सरने पीडित असलेले किंवा शेवटच्या स्टेजमधले जे लोक आहेत त्यांना आम्ही आमच्या घरी नेऊन सेवा देऊ शकतो. आमच्याकडे अगदी पॅरॅलिसिस (कमरेपासून पाय लुळे असलेले) तसेच वेगवेगळ्या आजारांनी त्रस्त झालेले, शेवटच्या स्टेजमधील लोक आहेत. ज्या लोकांना स्वत:च्या घरात आजारी व अत्यवस्थ लोकांची सेवा करणे होत नाही, ते त्यांना आमच्या घरी आणून सोडतात. मग अशा अत्यवस्थ लोकांचा आम्ही सांभाळ करतो.' मी सहज विचारले, तुम्ही किती जण आहात आणि तुमची काही संस्था आहे का? ते म्हणाले, ''सध्या मी अन् माझी पत्नी दोघेच आहोत. आम्ही आमच्या राहत्या चार खोल्यांच्या घरात हे सर्व चालवतो. माझे एक-दोन नातेवाइक बऱ्याचदा मला मदत करतात. आम्ही या आमच्या पेशंट्सना, आमची मुलं समजतो. त्यांना आंघोळ घालणं, जेवण

भरवणं ही सर्व कामं आनंदानं करतो. तुम्ही मला वेडा म्हणा किंवा काहीही म्हणा, पण मला यात आंतरिक समाधान मिळतं. मला या सेवेचा मोबदलासुद्धा कधी अत्यल्प मिळतो किंवा कधीकधी मिळतदेखील नाही. आमचं हे कार्य अन् घर चालवणं अगदी काटकसरीनं चालू आहे. तुम्ही एकदा नक्की येऊन बघा.'' माझ्या मनात वेगवेगळे विचार चालू होते. या माणसाचे कसे कौतुक करावे व आपण त्यांना आपल्याकडून काय मदत करू शकतो? असा कसा 'वसा' त्यांनी घेतला असेल? लोक स्वत:च्या सख्ख्या, तब्येतीने चांगल्या असणाऱ्या आई-वडिलांची सेवा नीट करू शकत नाहीत आणि ही दोघे इतक्या आत्मीयतेने संबंध नसलेल्या, परावलंबी, आजारी लोकांची सेवा कुणाच्याही मदतीची अपेक्षा न करतात कशी काय करतात बुवा? खरेच हे जग मोठे अनाकलनीय आहे. कुठे, कशी, कुठल्या प्रकारची, कुठल्या मातीतून घडलेली माणसे भेटतील काही सांगता येत नाही. मी त्यांच्या घरी जाण्याचे ठरवलेच. या गोष्टीला बरेच दिवस झाले आणि एक दिवस अचानक योग आला.

माझ्या पेशंटच्या घरचे आमंत्रण होते. बऱ्याच वर्षांनी त्यांना मुलगी झाली होती. त्यामुळे मला जाणे भाग होते. कार्यक्रम छोटासा, घरगुती, पण छान होता. त्या कार्यक्रमात मला हे गृहस्थ दिसले. मला बघून ते माझ्याजवळ आले व म्हणाले, 'काय डॉक्टर, ओळखलं का मला? मी अशोक राव. तुमच्याकडे आलो होतो एकदा भेटायला.' मला एकदम आठवले व मी म्हणाले, 'तुम्ही इथेच राहता ना?' ते म्हणाले, 'अगदी इथेच दोन घरे पलीकडे. येता का घरी?' कार्यक्रम संपलाच होता. जेवणही झाले होते. मी विचार केला, तसेही आपल्याला इथे यायचेच होते, पुन्हा परत कधी वेळ मिळेल न मिळेल. म्हणून मी म्हटले, 'चला, येते!' आम्ही लगेच आमच्या पेशंटच्या घरातील लोकांचा निरोप घेतला व त्यांच्या घराकडे निघालो.

त्यांचे घर बाजूलाच होते. छोटेसे, पण टुमदार होते. बाहेरून घराच्या टापटिपीची कल्पना येत होती. पोर्चमध्ये एक सत्तरीचे गृहस्थ पेपर वाचत बसले होते व दुसऱ्या आजीबाई काहीतरी विणत होत्या. अशोकरावांनी माझी त्यांच्याशी ओळख करून दिली, हे रिटायर्ड प्रोफेसर मि. काळे व या मिसेस अधिकारी. आतमध्ये गेल्यावर ते मला हळूच म्हणाले, ''मि. काळेंना पॅरॅलिसिस झाला आहे. कमरेखालचा भाग लुळा आहे. तुम्ही त्यांची चाकाची खुर्ची पाहिलीच असेल. त्यांची दोन्ही मुले बाहेरगावी आहेत. त्यांच्याकडे काळेकाकांची व्यवस्था होऊ शकली नाही. मीच त्यांना इथे घेऊन आलो. काळेकाकांच्या पत्नीही दोन

वर्षांपूर्वीच वारल्या. सुरुवातीला काळेकाका बरेच उदास असायचे आता ते आमच्याकडे चांगलेच रुळले आहेत. मिसेस अधिकारींना एकच मुलगा आहे तो अमेरिकेला असतो. त्या तिकडे जायला तयार नाहीत. त्यातच त्यांना अजिबात ऐकू येत नाही.''

आम्ही तोपर्यंत दिवाणखाण्यात आलो होतो. त्यांनी मिसेस रावना हाक मारली. चाळिशीची गोल चेहऱ्याची, हसरी, ठेंगणी व्यक्ती बाहेर आली. माझी ओळख झाल्यावर मग आम्ही आतल्या खोलीत गेलो. एक स्वयंपाकघर छोट्या तीन बेडरूम व एक हॉल असे हे घर होते. एक बेडरूम स्वत:साठी ठेवून त्यांनी उरलेल्या तीन रूममध्ये चार कॉट ठेवल्या होत्या. त्यांच्याकडे एकूण सात जण होते. त्यांनी मग माझी प्रत्येकाशी ओळख करून दिली. एक गृहस्थ स्वत: डॉक्टर होते. त्यांना मूलबाळ नव्हते. तशातच त्यांना घशाचा कॅन्सर झाला होता. रोज नळीतून सूप, वरण, फळांचा रस असे जेवण होते. मिसेस रावच त्यांचे सगळे जेवण बनवायच्या. दुसऱ्या एका आजीबाईंना संधिवात झाला होता. हाता-पायाची बोटे वाकडी झाली होती. अजिबात चालता येत नव्हते. राव दांपत्यच त्यांचे सगळे आवडीने बघायचे. मला आश्चर्याने धक्के बसत होते. अशोक राव पुढे म्हणाले, 'माझे एक-दोन नातेवाइक व मित्र मला थोडी मदत करतात. मला दोन मुले आहेत. दोघेही कॉलेजमध्ये शिकतात. त्यांना वेळ असेल तर ती पण कधी आम्हांला मदत करतात. माझ्या पगारात आमचे कसेबसे भागते. आमच्या या सेवेमुळे आमच्या ओळखीची, दूरची माणसेसुद्धा त्यांच्या नातेवाइकांना असे काही त्रास असतील तर आमच्याकडेच आणून सोडतात. त्यांचा खर्च देतात; पण आजकाल नोकर इतके सहजासहजी मिळत नाहीत आणि अशी काम करायला ते तयार नसतात. मला आता राव दांपत्याबद्दल प्रचंड आदर वाटू लागला. मी म्हटले, 'तुम्ही आणखी लोकांना सोबत घेऊन मोठी जागा पाहा. मी माझ्याकडून काही प्रयत्न करेन,' ते म्हणाले, देवाच्या कृपेने आम्हांला तशी जागा आता मिळालीय कारण आता आमचे काम पण वाढले आहे. आमची कुणाकडून काही अपेक्षा नाही. ज्याला इच्छा असेल त्याने आम्हांला हातभार लावावा. आम्ही दोघे निवडलेल्या कामासाठी समर्थ आहोत.

मी थक्क होऊन पाहतच राहिले. अशी कशी ही जगावेगळी माणसं? नकळत मी त्यांना मनोमन सलाम केला.

***



डॉ. सुषमा देशमुख
M.B.B.S., M.D., D.G.O.

- संचालिका, सेंट्रल इंडिया टेस्ट ट्युब बेबी सेंटर, देशमुख हॉस्पिटल, नागपूरमध्ये कार्यरत.
- स्त्री-आरोग्य विभाग प्रमुख, गेटवेल सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल.
- वीस वर्षांपासून स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून नागपूरमध्ये कार्यरत.
- अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग व शोधनिबंध.
- ॲकॅडमिक तीन पुस्तके - प्रकाशक जे. पी. ब्रदर्स, दिल्ली.
- ॲमॅझॉन बुक सीरिजमध्ये 'इनफर्टिलिटी मॅनेजमेंट मेड इझी' या पुस्तकाचा समावेश.
- मराठीमध्ये पाच पुस्तके.
  १. स्त्रीवंध्यत्व
  २. स्त्रीआरोग्य (पौगंडावस्था ते प्रौढावस्था)
  ३. स्त्री गर्भवती व सोनोग्राफी
  ४. जगावेगळी माणसं व जगावेगळ्या गोष्टी
  ५. अमृतधारा
- गर्भसंस्कार वर सी.डी. प्रकाशित.
- पब्लिक अवेअरनेसचे नियमित कार्यक्रम.

---

जगावेगळी माणसं, जगावेगळया गोष्टी म्हणजे आम्हा डाक्टरांच्या अनुभवाच्या अथांग सागरातून मंथन करून मिळालेले अमूल्य मोती, हिरे, माणकं! या कथा म्हणजे आम्हाला आमच्या रोजच्या धावपळीच्या आयुष्यात मिळणारे संस्काराचे धडेच! वयाचा, शिक्षणाचा, अनुभवाचा इथे प्रश्नच उरत नाही. करूणा, ममता, हिम्मत, सेवा, सामाजिक कर्तव्य, अशा वेगवेगळया गुणांचा अद्‌भूत संगम! यामधील प्रत्येक गोष्ट वेगळी आहे. आयुष्यात येणाऱ्या वादळांवर, आजारावर समर्थपणे मात करून हिमतीने लढा देणाऱ्या या प्रेरणादायक गोष्टी तशा विलक्षणच आहेत. स्वतःच्या कुटुंबासाठी, मित्रांसाठी, समाजासाठी तसेच जगाच्या कल्याणासाठी झटणाऱ्या या व्यक्ती म्हणजे माझे खरे आदर्श - हिरो - हिरॉईनस्!

त्यांना माझा कोटी कोटी प्रणाम!

BUY NOW

INKING INNOVATIONS

ISBN: 978-81-930643-4-4